**प्रेसनोट** **दि.२६/०६/२०१९**

**मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर.**

**हडपसर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १७८/१५ भादवि कलम ३७६(ड),४५२,३४२,३९२,५०६(२),३४ सेशन केस क्र.५४४/२०१५ मधील आरोपी नामे १)परविंदर सुवर्ण सिंग २) अक्षय गुरुदत्त इंदौरीया याचे दोषसिध्दीबाबत.**

वर नमुद दाखल गुन्हयातील फिर्यादी हया दि.२३/०७/२०१२ रोजी घरामध्ये एकटयाच असताना आरोपी १) परविंदर सुवर्ण सिंग, रा. कवडेमळा, घोरपडीगाव, पुणे २) अक्षय गुरुदत्त इंदौरीया, रा. गांधीपेठ चिंचवड, पुणे यांनी जबरीने घरात घुसून व फिर्यादी यांचे घरातील रोख रक्कम, सोन्याची चैन, २ घडयाळ, ३ मोबाईल असा एकुण २६,४५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरी करुन व फिर्यादी यांना जिवे मारण्याची धमकी देवून नमूद दोन्ही आरोपीतांनी जबरीने संभोग केला म्हणून त्याचे विरुध्द वर नमूद प्रमाणे हडपसर पोलीस ठाणे येथे दि. २०/०४/२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला होता व त्यानंतर सदरचा गुन्हा तपासकामी दि.२२/०५/२०१९ रोजी श्रीमती एस.एस. घार्गे, सहा. पोलीस निरीक्षक, मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर यांचेकडे देण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास श्रीमती.एस.एस.घार्गे, तत्कालीन सहा. पोलीस निरीक्षक, मुंढवा पोलीस ठाणे व सध्या पोलीस निरीक्षक, लोहमार्ग, पुणे यांनी हाताखालील कर्मचा-यांच्या मदतीने करुन नमूद आरोपीस अटक करुन दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने परिस्थीतीजन्य पुरावा व इतर महत्वाचे साक्षी पुरावे प्राप्त करुन,आरोपी विरुध्द दोषारोप पत्र सादर केले असता, सदर गुन्हयाची सुनावणी मा.जिल्हा व सत्र न्यायालय,पुणे यांचे न्यायालयमध्ये झाल्याने सदर गुन्हयामध्ये मा.न्यायालयाने सदर आरोपी नामे १) परविंदर सुवर्ण सिंग यास दिनांक २४/०६/२०१९ रोजी १० वर्ष सक्त मजुरी व ११ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास ९ महिने साधी कैद व आरोपी नामे २) अक्षय गुरुदत्त इंदौरीया, रा. गांधीपेठ चिंचवड, पुणे यास भा.द.वि. कलम ४५२, ३४२,३५४,३९२,५०६ मध्ये ४ वर्ष सक्त मजुरी व ६ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास ३ महिने साधी कैद शिक्षा सुनावलेली आहे.

**दि.२६/०६/२०१९**

**(संपतराव डी. भोसले)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**मुंढवा पोलीस स्टेशन, पुणे शहर**